MMRC

## मुंबई मेट्रो ३ तर्फे सिद्धिविनायक  ते कफ परेड स्थानकांच्या एस्केलेटर कार्यप्रणालीचा करार संपन्न

मुंबई मेट्रो ३ लाईनच्या १४ मेट्रो स्टेशनच्या (सिद्धिविनायक ते कफ परेड मेट्रो स्थानक) जायका कंपनीकडून कायदेशीर पडताळणीनंतर एस्केलेटर कार्यप्रणालीचा महत्वपूर्ण करार आज संपन्न झाला आहे.

'मेसर्स जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. इंडिया अँड एम / एसजेईसी कॉर्पोरेशन, चायना कन्सोर्टियम' यांच्यासह हा करार झाला असून पॅकेजेस 16 ए (लोट -2) च्या एस्केलेटर बांधणी करणार आहेत. हि कंपनी संबंधित बोलीदारांमधील सर्वात स्पर्धात्मक असल्याने देण्यात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन ने हा करार संबंधित कंपनीसोबत केला आहे. या कामामध्येएकूण १४ स्टेशनच्या एस्केलेटरचे डिझाइन, निर्मिती, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंगसह इतर संबंधित  205 प्रकारची कामे ही कंपनी करणार आहे. जास्त प्रवाशांच्या ये- जा करता संक्षिप्त रूपातल्या या एस्केलेटरवर विशेष पद्धतीने लक्ष दिले जात आहे, त्याचप्रमाणे ऊर्जाबचत व्हावी त्यासाठी रियल टाइम मॉनिटरेटिंग आणि रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने एस्केलेटरचे काम चालणार आहे.

त्यावर आपले मत व्यक्त करताना एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या , "मेट्रो ३ च्या भुयारी प्रवासात एस्केलेटरची अंमलबजावणी  हा प्रवाशांच्या आरामदायक आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा घटक आहे. मेट्रो -3 साठी मजबूत आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत एस्केलेटर प्रणाली अंमलबजावणी करण्याचा आमचा उद्देश आहे आणि वेळेत कार्य पूर्ण करावे जेणेकरून लाइन -3 प्रकल्प निर्धारित वेळेमध्ये पूर्ण केला जाऊ शकेल."